विद्यार्थी सुरक्षा संदर्भात मार्गदर्शक सूचना.

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन परिपत्रक क्र. संकीर्ण२०१७/प्र.क.(१७१/१७)/एसडी-६
हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय (विस्तार), मुंबई-३२
दिनांक :- ०२ जून, २०१८.

वाचा- १. बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम, २०००, (The Juvenile Justice (care and protection of children) Act, २०००).
२. बालविवाह प्रतिबंध कायदा, २००६ (Prohibition of child marriage Act, २००६).
३. बालकांचे लैंगिक अपराधापासून संरक्षणाचा अधिनियम, २०१२, (Prevention of child from sexual offences Act, २०१२)
४. अनैतिक व्यापार (प्रतिबंध) अधिनियम, १९५६ (The Immoral Traffic (Prevention) Act, १९५६)
५. बालकामगार (प्रतिबंध आणि नियमन), कायदा-१९८६, (child labor (Prohibition and Regulation) Act, १९८६).
६. शालेय शिक्षण वक्रीडा विभाग परिपत्रक क्र. प्राशिधो २०१३/प्र.क्र.२४/प्राशि १ दि. २२ फेब्रुवारी, २०१३.
७. शालेय शिक्षण वक्रीडा विभाग परिपत्रक क्र. संकीर्ण २०१६/प्र.क्र.१४४/१७/ एसडी.६ दि. ०४ ऑक्टोंबर, २०१६
८. मा. सर्वोच्च न्यायालयाचे सहाय्यक निबंधक यांचे पत्र क्र. डी.३६८८/२०१७/एससी /पीआयएल (रीट) दि. १२ जानेवारी, २०१८.

परिपत्रक

प्रस्तावना -

राज्यातील मुलांच्या सुरक्षितेसाठी शासनस्तरावरुन वेळोवेळी वरीलप्रमाणे आवश्यक कायदे पारित करण्यात आलेले आहेत. तसेच मा. सर्वोच्च न्यायालयाने रिट याचिका (सिव्हील) क्र. ८७४/२०१७ श्रीमती आभा आर. शर्मा आणि इतर विरुध्द केंद्र सरकार आणि इतर प्रकरणी सर्वोच्च न्यायालय यांनी राज्य शासनाने विद्यार्थी सुरक्षेसंदर्भात घ्यावयाच्या दक्षतेबाबत केलेली कार्यवाही कळविण्याचे निदेश दिले आहेत. केंद्र सरकारने या संदर्भात दि. १ सप्टेंबर, २०१७ आणि दि. ११ सप्टेंबर, २०१७ रोजी सर्व राज्यांना सूचना दिलेल्या आहेत. तसेच सर्वोच्च न्यायालयाने सुध्दा या प्रकरणी मार्गदर्शक सूचना दिलेल्या आहेत. त्यामुळे सर्व शाळा व कनिष्ठ महाविद्यालयामधील विद्यार्थ्यांच्या सूरक्षेच्या अनुषंगाने घ्यावयाच्या दक्षतेसंदर्भात राज्य स्तरावरुन सूचना देण्याचे विचाराधीन होते.

शासन परिपत्रक -

शालेय विद्यार्थ्यांच्या सुरक्षितते संदर्भात मा. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या मार्गदर्शक सूचनांना अनुसरुन या परिपत्रकान्वये खालीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत.

१ शाळेतील विद्यार्थ्यांवरील होणाऱ्या अत्याचाराची तक्रार दाखल करण्याबाबत, POCSO e-Box या राष्ट्रीय बाल अधिकार संरक्षण आयोगाने तयार केलेल्या सुविधेबाबतची माहिती तसेच महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाने तयार केलेल्या "CHIRAG" या App ची माहिती सर्व विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणण्यासाठी सूचना फलक लावावेत. तसेच POCSO e-Box व CHIRAG या App वर तक्रारी नोंदविण्यासाठी विद्यार्थ्यांना आवश्यक ती मदत करावी. बालकांविरुद्ध होणाऱ्या लैंगिक अपराधाबाबत माहिती असणाऱ्या व्यक्तीने त्याबाबत तात्काळ विशेष किशोर पोलिस पथक (Special Juvenile Police Unit) अथवा स्थानिक पोलिस स्टेशनला कळविणे बंधनकारक आहे.

२ शाळांमध्ये विद्यार्थी/ विद्यार्थीनींच्या सुरक्षिततेबाबत करावयाच्या ठोस उपाययोजनांचा भाग म्हणून राज्यातील सर्व माध्यमाच्या व सर्व व्यवस्थापनाच्या प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमध्ये तक्रार पेटी बसविण्याची व्यवस्था करावी.

३ शाळा व्यवस्थापनाने शाळेच्या आवारात /प्रवेश व्दारावर तसेच बाहेर जाण्याच्या दरवाज्याजवळ पुरेसे सी.सी टि.व्ही कॅमेरा बसवावेत.

४ शाळेच्या प्रवेशव्दाराजवळ तसेच निर्गमनव्दाराजवळ पुरुष अथवा महिला सुरक्षा रक्षक नेमलेला असावा.

५ शाळेच्या परिसरामध्ये कोणतीही अनधिकृत व्यक्ती प्रवेश करणार नाही याची दक्षता घ्यावी.

६ विद्यार्थी शाळेच्या परिसरात उपस्थित असताना त्यांच्या सुरक्षिततेची संपूर्ण जबाबदारी शाळेची राहील.

७ व्यवस्थापनाने शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांबरोबर बैठक आयोजित करुन सुरक्षेच्या दृष्टीने आवश्यक त्या उपाययोजना कराव्यात.

८ शाळेतील मुलांच्या उपस्थिती संदर्भात सकाळी, दुपारी आणि शाळा सुटण्याच्या वेळेस संध्याकाळी हजेरी नोंदविण्यात यावी व अनुपस्थित विद्यार्थ्यांबाबत त्यांच्या पालकांना एसएमएसव्दारे कळविण्यात यावे.

९ शाळा व्यवस्थापनाने शिक्षक / पालक / कर्मचारी व विद्यार्थी यांचा समावेश असलेली दक्षता समिती नेमून संबंधित पालक समितीसोबत चर्चासत्र आयोजित करावेत.

१० विद्यार्थी मानसिक दबावाला बळी पडू नये म्हणून व्यवस्थापनाने शाळेत समुपदेशनाची व्यवस्था करावी.

११ खाजगी वाहनाने येणाऱ्या विद्यार्थ्यांच्या पालकांना संबंधित वाहन चालकाच्या वर्तणूकीची पडताळणी करण्याबाबत पालकांना सूचित करण्यात यावे. तसेच सुरक्षेच्या दृष्टीने त्यांची आवश्यक वैयक्तिक माहिती पालकांनी स्वत:कडे ठेवावी.

१२ शाळेतील विद्यार्थ्यांच्या बसमध्ये कोणत्याही अनधिकृत व्यक्तीस बसण्याची अनुमती असू नये. व याबाबतच्या सूचना मुख्याध्यापकांनी/संबंधित व्यवस्थापकांनी सर्व बस चालकांना दयाव्यात.

१३ बस चालकांनी शालेय विद्यार्थ्यांस बसमधून त्याच्या इच्छित (निवास स्थानाजवळच्या) ठिकाणीच सोडावे.

१४ बसमधून प्रवास करणाऱ्या शेवटच्या मुलीला इच्छित (निवास स्थानाजवळच्या) ठिकाणी सोडेपर्यंत बस मध्ये महिला सेविका/शिक्षिका असावी.

१५ शाळा व्यवस्थापनातर्फे शाळा सुटल्यानंतर शाळेतील वर्गामध्ये, प्रसाधनगृहामध्ये तसेच अन्य ठिकाणी / परिसरात कोणताही विद्यार्थी मागे राहिला नसल्याची खातरजमा करावी.

१६ शाळेतील मुलींस शालेय उपक्रम/ स्पर्धांसाठी शाळाबाहेर पाठविताना शक्यतो महिला शिक्षिका/ सेविका यांच्या सोबत पाठवावे.

१७ शाळेतील कनिष्ठ व वरिष्ठ विभाग शक्यतो स्वतंत्र असावेत.

१८ शाळेतील मुलांचे व मुलींचे प्रसाधनगृह स्वतंत्र व पुरेसे अंतरावर असावेत. मुलींच्या प्रसाधनगृहात महिला सेविकांची सुविधा असावी तसेच शाळेतील शिक्षक व कर्मचारी यांच्याकरिता स्वतंत्र प्रसाधनगृह असावेत.

१९ कोणत्याही मुलास शारिरीक अथवा मानसिक इजा पोहचेल अशा प्रकारची शिक्षा करण्यात येऊ नये.

२० आकस्मित प्रकरणी मुलांचे पालक किंवा नातेवाईक शाळेत उपस्थित होईपर्यंत मुख्याध्यापकांनी शाळेतील मुलांचा ताबा शक्यतो शाळेतील महिला शिक्षकाकडे सोपवावा.

२१ शाळा व्यवस्थापन/ शिक्षक यांनी कोणत्याही विद्यार्थ्यांस पालकांच्या संमतीशिवाय अधिकृत ओळखपत्र तपासल्याखेरीज (शासनाने मान्यता दिलेले कोणतेही ओळखपत्र उदा. पॅन कार्ड/ आधार कार्ड) अन्य व्यक्तींकडे सोपवू नये.

२२ शाळेतील शिक्षक/ कर्मचारी यांची नियुक्ती व्यवस्थापनातर्फे करताना संबंधितांचे चारित्र्य पडताळणी प्रमाणपत्र संबंधित पोलिस विभागाकडून घेतलेले असावेत.

२३ शाळेतील वाहतूक सुरक्षा, गृहव्यवस्थापन तसेच उपहारगृह यासाठी नेमण्यात येणारा कर्मचारी वर्ग मान्यताप्राप्त संस्थेकडून नेमण्यात यावा. सदर कर्मचाऱ्यांचे देखील पोलिस विभागाकडून चारित्र्य पडताळणी प्रमाणपत्र घेतलेले असावे.

उपरोक्त आदेश सर्व क्षेत्रिय अधिका-यांनी सर्व माध्यमांच्या व व्यवस्थापनाच्या शाळांच्या मुख्याध्यापकांच्या/प्राचार्य यांच्या निदर्शनास आणण्यात येवून कार्यवाही करण्याच्या सूचना द्याव्यात.

मा. सर्वोच्च न्यायालयाने या संदर्भात तयार केलेल्या मार्गदर्शक सूचना माहितीस्तव सोबत जोडल्या आहेत.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेताक २०१८०६०२१४५६०८६६२१ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Suvarna Siddharth Kharat

Digitally signed by Suvarna Siddharth Kharat
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=School Education And Sports Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=065279b98828b1456ad0d62a97fa45eee948af8abe5a27104d4e132c5bd1d93a, cn=Suvarna Siddharth Kharat
Date: 2018.06.02 14:58:14 +05'30'

(डॉ. सुवर्णा खरात)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

<u>प्रत, माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.</u>

१) मा. राज्यपालांचे सचिव, राजभवन, मुंबई.
२) मा. मंत्री, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मुंबई.
३) मा. विरोधी पक्ष नेता, (विधान सभा/ विधान परिषद), विधानभवन, मुंबई.
४) सर्व मा. विधान सभा सदस्य/ विधान परिषद सदस्य, विधानभवन, मुंबई.
५) मा. अपर मुख्य सचिव, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
६) मा. प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई.
७) मा. प्रधान सचिव, नगर विकास(२) विभाग, मंत्रालय, मुंबई.
८) मा. प्रधान सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,मंत्रालय, मुंबई.
९) मा. प्रधान सचिव, अल्पसंख्यांक विकास विभाग,मंत्रालय, मुंबई.
१०) मा. सचिव, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई.
११) मा. सचिव,आदिवासी विकास विभाग, मुत्रालय, मुंबई.
१२) मा. सचिव, महिला व बालविकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
१३) मा. आयुक्त शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१४) सर्व महानगरपालिका आयुक्त
१५) राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई.
१६) संचालक, विद्या प्रधिकरण, पुणे.
१७) मुख्य कार्यकारी अधिकारी, सर्व जिल्हा परिषद.
१८) मुख्य अधिकारी, सर्व नगरपरिषद
१९) शिक्षण संचालक (माध्य. व उच्च माध्य.), शिक्षण संचालनालय, पुणे.
२०) शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
२१) शिक्षण संचालक, अल्पसंख्याक व प्रौढ शिक्षण संचालनालय, पुणे

२२) अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे.
२३) विभागीय शिक्षण उपसंचालक (सर्व)
२४) शिक्षण अधिकारी (माध्यमिक, प्राथमिक, निरंतर)
२५) शिक्षण निरीक्षक (उत्तर/दक्षिण/पश्चिम), मुंबई.
२६) जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था(सर्व)
२७) निवड नस्ती, एसडी-६.